Arunodaya Dnyan Prasarak Mandal's

**Women's College of Arts, Commerce and Home Science Jalgaon**

## National Seminar on Book and Film Criticism (Writing Skills and Its Application)

## REPORT

The Department of Marathi, ADPM's Women's College of Arts, Commerce and Home Science, Jalgaon, organized a seminar on *Book and Film Criticism (writing skills and its application)* on 7 and 8 March 2015.

The seminar was inaugurated by the secretary, Prof. A. P. Chaudhari, and the chairman Hon. Shri. S. D. Chaudhari chaired the function. In his speech he stated that if world famous films and literature is well analysed it will created interest in the audience and the readers. He also mentioned the writings of Dr. Bhalchandra Nemade and some Saint Literatures in Marathi language. Principal Dr. Sanjay Bharambe put the report of the institution on its Silver Jubilee year. Prof. Dr. Prabhavati Mahajan gave introductory speech and Prof. Prakash Kamble Compeered the session were as Prof. Sugandha Patil put vote of thanks.

Shri. Sanjay B. Joshi in his Keynote address said that, 'the world is the Mahabharata and not the Ramayana. If a writer writes with specific point of view it will be injustice for the creativity of readers. A film must depict contemporary society'. 'Now days we have films without awareness of reality, he boldly stated.

There were eight paper presentations in the first session on the theme literature and play criticism. Dr. Rajaram Jadhav was the chairperson and Dr. P.B. Mahajan compeered the session.

The theme of second session was criticism literature and films criticism. Seven research papers were presented in this session. Dr. Sampatrao Gaikwad chaired the session and Dr. Usha Sapkale compeered the session. There were eight papers presented in the third session under the chairman ship of Dr. Mukta Mahajan.

In the fifth session ten research papers were presented on the theme Film Adaptation, the session was chaired by Prof. Charuta Gokhale and compeered by Dr. Sulochana Patil.

Dr. Rajaram Jadhav, MC Member of SNDTW University, Mumbai and Chairman of BOS in Marathi, was the chairperson in the valedictory function. Critic Dr. Keshav Tupe was the chief guest of the function. The

R-NAAC Accrediated
COLLEGE OF ARTS, COM. & HOME SCI. JALGAON WOMEN'S

Principal
A.D.P.M's Women's College of Art's, Com. & Home Sci. Jalgaon

participant Dr. Bharti Tendolkar, and the Student Ku. Nupur Jain expressed their experiences about the seminar. Dr. Prabhavati Mahajan put the vote of thanks and all the members of management cooperated for the success of the function. Total 89 participants were actively participated in the Seminar.

WOMEN'S COLLEGE OF ATR'S. COM. & HOME SCI. JALGAON
R-NAAC Accrediated

Principal
A.D.P.M's Women's College of
Art's, Com. & Home Sci. Jalgaon

2014-15 (1)

# चर्चासत्राचा अहवाल

## ग्रंथ, चित्रपट समीक्षा (लेखन कौशल्य व उपयोजन)

अरुणोदय ज्ञानप्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय, जळगाव मराठी विभाग आयोजित ग्रंथ, चित्रपट समीक्षा (लेखन कौशल्य व उपयोजन) या विषयावरील द्विदिवसीय चर्चासत्र दि. ७ व ८ मार्च २०१५ रोजी संपन्न झाले.

उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन मा. श्री. एस्.डी. चौधरी आणि उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव मा.प्रा. ए.पी. चौधरी होते. डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्याचा उल्लेख करत संतांच्या साहित्याचाही उल्लेख केला. अध्यक्षीय भाषणात सर म्हणाले, चर्चासत्राच्या माध्यमातून नवसमीक्षकांनी उत्तमोत्तम जागतिक दर्जाच्या कृतीची व चित्रपटांची ओळख करुन दिल्यास वाचकांच्या अभिरुचीचा दर्जा उंचावेल. प्राचार्य डॉ. सं.ना. भारंबे यांनी रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या वाटचालीचा आलेख मांडला. प्रा.डॉ. प्रभावती महाजन यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रकाश कांबळे यांनी सूत्रसंचालन व प्रा. सुगंधा पाटील यांनी आभार व्यक्त केले.

बीजभाषक श्री. संजय भास्कर जोशी यांनी आपले मत व्यक्त करत म्हणाले, ''जग हे रामायण नसून महाभारत आहे. लेखक जर एकच पॉईंट ऑफ व्ह्यू दाखवत राहिला तर तो वाचकांच्या सर्जनावर अन्याय करतो. समाजात जे घडत आहे त्याचं वास्तवदर्शन आजच्या सिनेमाने दाखववावे. आपल्याकडे वास्तवाचे भान नसलेल्या चित्रपटांना जास्त मागणी आहे.'' असे परखड मत त्यांनी मांडले.

प्रथम सत्रात 'ग्रंथ/नाट्य समीक्षा' या विषयावरील आठ शोधनिबंधांचे वाचन केले गेले. अध्यक्षस्थान डॉ. राजाराम जाधव यांनी स्वीकारले. सूत्रसंचालन डॉ. प्रभावती महाजन यांनी केले.

द्वितीय सत्रात डॉ. संपतराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली 'ग्रंथ ते चित्रपट समीक्षा' या विषयावर सात निबंधांचे वाचन करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. उषा सपकाळे यांनी केले. तृतीय सत्रात डॉ. मुक्ता महाजन यांच्या अध्यक्षतेखाली आठ शोधनिबंधांचे वाचन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. सुगंधा पाटील यांनी केले.

दुसऱ्या दिवशी ८ मार्च २०१५ रोजी चतुर्थ सत्रात 'चित्रपट समीक्षा' या विषयावरील डॉ. भारती तेंडूलकर यांच्या अध्यक्षतेखाली आठ निबंधांचे वाचन करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. गीता नेहेते यांनी केले.

पाचव्या सत्रात 'ग्रंथ ते चित्रपट माध्यमांतर समीक्षा' या विषयावर दहा शोधनिबंधांचे वाचन करण्यात आले. त्याचे अध्यक्षस्थान प्रा. चारुता गोखले यांनी भूषविले तर सूत्रसंचालन डॉ. सुलोचना पाटील यांनी केले.

चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचे एम.सी. मेंबर, मराठी अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. राजाराम जाधव होते तर प्रमुख पाहुणे म्हणून समीक्षक डॉ. केशव तुपे हे होते.

या कार्यक्रमात डॉ. दिलीप अलोणे (अकोला) व डॉ. भारती तेंडूलकर आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून कु. नुपूर जैन यांनी चर्चासत्राच्या संदर्भातील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुगंधा पाटील यांनी केले तर डॉ. प्रभावती महाजन यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, प्राचार्य व मॅनेजमेंट यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

□□□



R-NAAC Accredited
Women's College of Arts, Com. & Home Sci., Jalgaon

Principal
A.D.P.M's Women's College of
Art's, Com. & Home Sci. Jalgaon

दैनिक चौफेर मत — चौफेर बातम्यांचा वेध
जळगाव । सोमवार, दि. 9 मार्च 2015

# ग्रंथ, चित्रपट समीक्षा विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप



**जळगाव, प्रतिनिधी :** येथील अरुणोदय ज्ञान प्रसारक मंडळ संचलित, कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय मराठी विभाग आयोजित ग्रंथ, चित्रपट समीक्षा या विषयावरील व्दिदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा काल मान्यवरांच्या हस्ते समारोप झाला.

दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्राचा विषय चित्रपट : समीक्षा व सिध्दांत हा होता. अध्यक्षा एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई येथील डॉ.भारती तेंडूलकर व डॉ.अनुराधा पोतदार उपस्थित होत्या. या सत्रात प्रा.रजनी पाटील, डॉ.उषा सपकाळे, डॉ.अलका घाटगे व प्रा.शमा सुबोध यांनी शोध निबंध सादर केले. दुसऱ्या सत्राचा विषय नाट्य व चित्रपट समीक्षा हा होता. अध्यक्षा मू.जे.महाविद्यालय, जळगाव येथील डॉ. चारुलता गोखले उपस्थित होत्या. या सत्रात डॉ.विवेक खरे, प्रा.निकुंभ, प्रा.लोखंडे, प्रा.योगेश महाले, प्रा. वसंत पानसरे यांनी शोध निबंध सादर करुन चर्चा केली.

प्रा.दिलीपअलोणे वप्रा.युनुस शेख यांनी चर्चेत सक्रिय सहभाग नोंदवत चर्चासत्राला जिवंतपणा आणला.

तिसऱ्या व समारोप सत्राचे अध्यक्ष म्हणून एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई येथील मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजाराम जाधव होते. या सत्राचे प्रमुख वक्ते अमरावती येथील साहित्य समीक्षक डॉ.केशव तुपे यांनी नाटक व साहित्याला कला म्हणून संबोधणे व समजून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादित केले. तसेच त्यांनी कलेचे सामर्थ्य व मर्यादा ओळखून त्याची समीक्षा होणे आवश्यक आहे असे म्हटले. आपल्या भाषणात त्यांनी उपस्थितांना भारतीय साहित्य व कलेला समृध्द अशी परंपरा आहे याची ओळख करुन दिली. जगण्याचे दर्शन साहित्यामधून मिळत असते, असेही त्यांनी म्हटले. तत्पूर्वी डॉ.दिलीप अलोणे, डॉ.भारती तेंडूलकर व महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु.नूपूर जैन यांनी आपली मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भारंबे, उपप्राचार्य डॉ.के.एच. नेहेते, मराठी विभाग प्रमुख व संयोजिका प्रा.डॉ.प्रभावती महाजन उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व परिचय प्रा.सौ. सुगंधा पाटील व आभार प्रा.प्रकाश कांबळे यांनी मानले. चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.सुलोचना पाटील, प्रा.डॉ.गिता नेहेते यांनी सहकार्य केले.

Principal
A.D.P.M's Women's College of Arts, Com. & Home Sci. Jalgaon

R-NAAC Accredited

# ग्रंथ, चित्रपट समीक्षा (लेखन कौशल्य व उपयोजन)
## राष्ट्रीय चर्चासत्रातील क्षणचित्रे



चर्चासत्राचे उद्घाटन करताना संस्थेचे सचिव मा.प्रा. ओ. चौधरी, डावीकडून डॉ. प्रभावती महाजन, उपप्राचार्य किशोर नेहेते, संस्थेचे चेअरमन मा.श्री. एस.डी. चौध प्राचार्य डॉ. सं.ना. भारंबे, बीजभाषक श्री. संजय भास्क जोशी उपस्थित.



चर्चासत्राचे बीजभाषण करताना चित्रपट समीक्षक मा.श्री. संजय भास्कर जोशी.




चर्चासत्रात डॉ. मुक्ता महाजन यांच्या अध्यक्षतेखाली 'ग्रंथ चित्रपट समीक्षा' या विषयावरील शोधनिबंधावर चर्चा करता डॉ. भारती तेंडूलकर व उपस्थित डॉ. प्रकाश सपकाळे.



चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी विचारमंचावर उपस्थित डावीकडून डॉ. प्रभावती महाजन, प्राचार्य डॉ. सं.ना. भारंबे, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातील मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य डॉ. राजाराम जाधव व प्रमुख पाहुणे समीक्षक डॉ. उत्तम तुपे.



NAAC Accredited

Principal
A.D.P.M's Women's College of
Arts, Com. & Home Sci. Jalgaon